संशोधन प्रकल्प

# मुक्त व दूरशिक्षण पद्धतीतील संमंत्रक व्यवसाय अभिवृत्तीचा अभ्यास

दूर शिक्षण परिषदेद्वारा प्रस्तुत संशोधन प्रकल्पास
आर्थिक अनुदान प्राप्त

**मार्गदर्शक**

**डॉ. माणिकराव सांळुखे**
कुलगुरू, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रकल्प संशोधक**

**डॉ. सज्जन शंकरराव थूल**
सहायक प्राध्यापक, मूल्यमापन विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गंगापूर धरणाजवळ, नाशिक -४२२२२२

वर्ष : सप्टेबर २०१५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गंगापूर धरणाजवळ, नाशिक -४२२२२२

# अनुक्रमणिका


| क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | अनुक्रमणिका | २ |
| ०२ | प्रास्ताविक | ३ |
| ०३ | ऋणनिर्देश | ४ |
| ०५ | कोष्टक यादी | ५ |
| ०६ | संशोधनाची पार्श्वभूमी | ८ |
| ०७ | संशोधनाचे महत्त्व व गरज | ९ |
| ०८ | संशोधनाचे शीर्षक | १० |
| ०९ | संशोधनाची उद्दिष्टे | १० |
| १० | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | १० |
| ११ | संशोधन कार्यपद्धती | १० |
| १२ | संमंत्रक अभिवृत्ती मापिका विकसन | ११ |
| १३ | संशोधनासाठी माहिती संकलन व विश्लेषण | १२ |
| १४ | निष्कर्ष | ४१ |
| १५ | शिफारशी | ४५ |
| | परिशिष्टे | |
| १ | संमंत्रक अभिवृत्ती मापिका | ४६ |
| २. | संशोधन प्रस्ताव मान्य प्रत | ४८ |

# संशोधनाचा विषय

## मुक्त व दूरशिक्षण पद्धतीतील संमंत्रक व्यवसाय अभिवृत्तीचा अभ्यास

---

### 01 संशोधनाची पार्श्वभूमी

मुक्त व दूरशिक्षण पद्धतीची सुरूवात अठराव्या शतकात झाली. पत्रव्यवहाराद्वारा शिक्षण घेऊन अध्ययनार्थी स्वत:चा विकास करीत होता. जीवनावश्यक शिक्षण, शेतकऱ्यासाठी शिक्षण, औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी शिक्षण तसेच दडपलेल्यांसाठी शिक्षणाची सुरूवात करण्यात आलेली होती. लोकसंख्येचा प्रस्फोट, ज्ञानाचा प्रस्फोट व तंत्रज्ञानाचा प्रस्फोट ह्यांमुळे शिक्षणाच्या कक्षा रूंदावलेल्या आहेत. मुक्त विद्यापीठे, मुक्त शिक्षण संस्था व नियमित विद्यापीठातील दूरशिक्षणाची संचालनालये निर्माण करून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. मुक्त विद्यापीठाद्वारे अध्ययनार्थीसाठी मोठ्याप्रमाणावर विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून दिले जात आहेत. त्यामुळे ज्ञान, कौशल्य व अभिवृत्तीचा विकास या शिक्षणक्रमांमधून होत आहे.

मुक्त व दूरशिक्षणपद्धतीमुळे शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. त्यामागील कारण म्हणजे मुक्त विद्यापीठांनी विविध प्रकारचे उपयोगी शिक्षणक्रम सुरू केलेले आहेत. या शिक्षणक्रमाला प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांना सहज प्रवेश, दहावी पास व नापासांना शिकण्याची संधी, शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना पुन्हा संधी, फुरसदिच्या वेळेत अध्ययनासाठी उपयोग, संमंत्रकाचे समुपदेशन आणि अध्ययन साहित्याची निर्मिती करून त्यांना अध्ययनाची आवड निर्माण करण्याचे कार्य केले जात आहे.

अध्ययनार्थीने प्रवेश घेतल्यानंतर अनेक बाबींच्या पुर्ततेसाठी अभ्यासकेंद्रावर जाऊन विद्यार्थ्यांना अध्ययन पूर्ण करावे लागते. अभ्यासकेंद्रावर केंद्रप्रमुख, संयोजक, संमंत्रक व प्रशासकीय व्यक्तींची नेमणुक केली जाते. त्यानंतर अभ्यासकेंद्रावर अंमलबजावणीचे कार्य केले जाते. विद्यापीठाशी संबंधित वाबींची पूर्तता करण्यासाठी त्यांना विविध कामे करावी लागतात. या शिवाय विद्यार्थ्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्याचे काम केले जात आहे.

मुक्त व दूरशिक्षण पद्धतीच्या विकासासंदर्भात रॉजर्स ह्यांची संमंत्रण उपपत्ती महत्त्वाची आहे. त्यांच्यामते कोणत्याही व्यक्तींच्या गटासमोर एखादी समस्या ठेवली तर तो गट त्या समस्येवर उपाये शोधायला उत्सुक होतो. हा उपाय शोधण्याची त्यांना आंतरिक तळमळ किंवा चिंता वाटू लागते. त्यामुळे गटातील व्यक्ती समस्येसंबंधी एकमेंकामध्ये चर्चा करू लागतात. समस्या सोडविण्यासाठीच्या अध्ययनार्थ्यांच्या

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

गंगापूर धरणाजवळ, नाशिक-422 222

## अंतर्गत संज्ञापन पत्र

प्रेषक: सहायक प्राध्यापक, मूल्यमापन विभाग

प्रति: मा. कुलगुरू

विषय: संशोधनासाठी अनुदानबाबत,,,

धारिका: HV /2015/

दिनांक : 05/03/2015

दूर शिक्षण ब्युरो संशोधन व विकास या अंतर्गत संशोधनासाठी 1.5 लाखापर्यंत अनुदान घेता येते. या योजनेअंतर्गत संशोधन प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे. **मुक्त व दूरशिक्षण पद्धतीतील संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करून तिची परिणामकारकता तपासणे** या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले आहे. संमंत्रक अभिवृत्ती मापिकाद्वारे संमंत्रणातील कार्यपद्धतीविषयी माहिती संकलित करता येईल. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी सकारात्मक दृष्टि असणारे संमंत्रक निवड करण्यास ही मापिका उपोयगी ठरेल, असे वाटते.

संशोधन आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या सुचनेनुसार प्रस्तुत संशोधन आराखड्यात योग्य त्याठिकाणी बदल करण्यात आलेले आहेत.

**प्रस्ताव:** प्रस्तुत लघू संशोधन प्रकल्प राबविण्यास व रू. 20,000/-(वीस हजार मात्र) या अर्थिक खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत** : संशोधन आराखडा रुपरेषा

05/03/15

(डॉ. सज्जन थूल)

सहायक प्राध्यापक, मूल्यमापन विभाग

मार्फत सादर:

मा. कुलसचिव

मा. वित्त अधिकारी

9/3/15

Account Officer

कुलसचिव कार्यालय आवक क्र.: 7366 दिनांक: 5/3/2015

# संशोधन आराखडा

## मुक्त व दूरशिक्षण पद्धतीतील संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करून तिची परिणामकारकता तपासणे

मुक्त व दूरशिक्षण शिक्षणपद्धतीमुळे शिक्षण घेणाऱ्याच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. त्यामागील कारण म्हणजे मुक्त विद्यापीठांनी विविधप्रकारचे उपयोगी शिक्षणक्रम सुरू केलेले आहेत. या शिक्षणक्रमाला प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांना सहज प्रवेश, दहावी पास नापासांना प्रवेश, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या पुन्हा संधी, फुरसदिच्या वेळेत अध्ययनासाठी सद्‌उपयोग, संमंत्रकाचे समुपदेशन आणि अध्ययन साहित्याची निर्मिती करून त्यांना इत्यादी बाबींची सुविधा दिली जाते. त्यामुळे प्रवेश घेतल्यानंतर अनेक बाबींच्या पूर्ततेसाठी अभ्यासकेंद्रावर जाऊन विद्यार्थ्यांना अध्ययन पूर्ण करावे लागते. अभ्यासकेंद्रावर केंद्रप्रमुख, संयोजक, संमंत्रक व प्रशासकीय व्यक्तींची नेमणुक केली जाते. या व्यक्तींची नेमणुक करतेवेळी त्याची शैक्षणिक पात्रता व अनुभव विचारात घेतला जातो. त्यानंतर अभ्यासकेंद्रावर अंमलबजावणीचे कार्य केले जाते. विद्यापीठाशी संबंधित बाबींची पूर्तता करण्यासाठी त्यांना विविध कामे करावी लागतात. या शिवाय विद्यार्थ्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्याचे काम केले जाते.

या अभ्यासकेंद्रावर संमंत्रकाची नेमणुक करण्यात येते. समंत्रकाची शैक्षणिक पात्रता व अनुभव लक्षात घेतला जातो. संमंत्रकाला अभ्यासकेंद्रावर विद्यार्थी, पालक, संयोजक व केद्रप्रमुख यांचेशी समन्वय साधून कार्य करावे लागते. विद्यापीठानी दिलेल्या वेळापत्रकानुसार त्यांना संमंत्रणाचे तास घ्यावे लागतात. हे समंत्रक पारंपारिक विद्यापीठात अध्यापक असल्यामुळे त्यांना अध्यापनात अध्यापकाची भूमिका व समंत्रण सत्रात संमंत्रकाची भूमिका बजावी लागते. त्यामुळे संमंत्रकाच्या भूमिकेत बदल होत असतात. ही कार्य करतेवेळी संमंत्रकाला रचनात्मक मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनाचे कार्य करावे लागते.

ही कार्य करतेवेळी संमंत्रकाविषयी विद्यार्थी, अभ्यासकेंद्रावरील व्यक्ती, पालक, विद्यापीठातील संबंधित व्यक्ती टिका करीत असतात. संमंत्रक थेट अध्यापन करीत असतात, संमंत्रकाडून संमंत्रणाचे होत नाहीत, संमंत्रकाकडून विद्यापीठाला शैक्षणिक मदत होत नाहीत. संमंत्रकांची अभिवृत्तीमुळे समस्या, अडचणीं सोडविण्यास मदत होत असते. त्यामुळे संमंत्रकाची अभिवृत्ती मापिका तयार करावी, अशी जिज्ञासा मनात आली. संमंत्रक अभिवृत्ती मापिकेद्वारे तसेच संमंत्रकाची निवड करतेवेळी सकारात्मक दृष्टि असणारे संमंत्रक मिळण्यास विद्यापीठाला मदत होईल. ही गरज लक्षात घेऊन तसेच संशोधनाचे महत्त्व लक्षात घेता विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रावरील समंत्रण

योग्य होतील.

### संशोधन समस्या

मुक्त व दूरशिक्षण पद्धतीतील संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करून तिची परिणामकारकता तपासणे

### संशोधनाची उद्दिष्टे

01 शैक्षणिक संमंत्रकाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्यपद्धतीचा शोध घेणे.

02 शैक्षणिक संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करणे.

03 शैक्षणिक संमंत्रक अभिवृत्ती मापिकेची परिणामकारकता तपासणे.

### व्याप्ती व मर्यादा

01 प्रस्तुत संशोधन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी संबंधित संमंत्रकाशी संबधित आहे.

02. प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील चार विभागीय केंद्राचा समावेश केला जाईल.

03. प्रस्तुत संशोधनासाठी बी.ए., बी. कॉम., बी.एड., बी.लिब. एम.लिब. शिक्षणक्रमाशी संबंधित संमंत्रकाचा समावेश करण्यात येईल.

04 प्रस्तुत संशोधन सन 2015 या कालावधीसाठी संबंधित आहे.

05 प्रस्तुत संशोधन संमंत्रकाच्या संमंत्रण कार्याशी निगडीत आहे..

06 प्रस्तुत संशोधनासाठी दोनशे संमंत्रकाचा समावेश करण्यात येईल.

### गृहितके

01 संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करता येते.

02 संमंत्रकाची शैक्षणिक कार्यपद्धती निश्चित आहे.

03 संमत्रकाची अभिवृत्ती मोजता येते.

## संशोधन पद्धती

01 प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

02 प्रस्तुत संशोधनासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी संबंधित संमंत्रकाचा नमुना म्हणून वापर करण्यात येईल. नमुना निवड करण्यासाठी संभाव्य निवड पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाईल. नमुना आकार खालीलप्रमाणे आहे.

2 :

| क्र | नमुना प्रकार | जनसंख्या | नमुना | टक्के |
|---|---|---|---|---|
| 01 | विभागीय केंद्र | 10 | 05 | 50 |
| 02 | संमंत्रक | 5000 | 200 | 25 |

03 प्रस्तुत संशोधनासाठी संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करण्यात येईल. या अभिवृत्ती मापिकेची परिणामकारकता तपासण्यासाठी 200 समंत्रकाकडून माहिती घेतली जाईल. त्यानंतर संख्याशास्त्रीय विश्लेषण करून तिची परिणामकारकता तपासण्यात येईल.

04 संमंत्रकाकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी t-score, mean SD या तंत्राचा वापर करण्यात येईल.

**संशोधनाची रूपरेषा**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी विविध अभ्यासकेंद्रावरील समंतकांशी संबधित माहिती संकलित केली जाईल. शैक्षणिक व प्रशासकीय कार्यासंबधिच्या माहितीचे संकलन केले जाईल. या माहितीच्या आधारे संमंत्रक अभिवृत्ती मापिका तयार करण्यात येईल. या अभिवत्ती मापिकेची पाच तज्ज्ञांकडून आशय सप्रमाणता तपासली जाईल. अभिवृत्तीची वैधता व विश्नसनियता तपासली जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष गटावर अभिवृत्ती मापिकाद्वारे माहिती संकलित केली जाईल. अभ्यास गटाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संमंत्रक अभिवृत्ती मापिकेची परिणामकारकता तापसली जाईल. त्यांनतर निष्कर्ष मांडण्यात येतील.

**खर्चाचा तपशिल**

| क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| 01 | माहिती संकलनासाठी टीए/डी.ए. | 10,000 |
| 02 | स्टेशनरी, अहवाल टंकलेखन व छपाई | 10,000 |
| | एकूण | 20,000 |

**संशोधक**
डॉ. सज्जन थूल, सहायक प्राध्यापक, मूल्यमापन विभाग,
य.च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक